आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दु. १.३० वाजता

१२ मार्च २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- भारतीय रेल्वेमध्ये गेल्या दहा वर्षांत सर्वसमावेशक परिवर्तन झालं असून रेल्वेचा विकास हा सरकारच्या प्रमुख प्राधान्यांपैकी एक असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन / अहमदाबाद इथून केलं रेल्वेशी निगडीत ८५ हजार कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि भूमीपूजन

- हरयाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर आणि त्यांच्या संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा

- नागरिकत्व सुधारणा कायद्याअंतर्गत अर्ज स्वीकारण्यासाठी केंद्रसरकारचं विशेष पोर्टल सुरु / सीएए च्या अंमलबजावणीचे आसामात पडसाद

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मुंबईची स्थिती मजबूत/ मुशीर खानचं शतक

**<><><><><><>**

भारतीय रेल्वेमध्ये गेल्या दहा वर्षांत सर्वसमावेशक परिवर्तन झालं असून रेल्वेचा विकास हा सरकारच्या प्रमुख प्राधान्यांपैकी एक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज सकाळी गुजरातमध्ये अहमदाबाद इथं सुमारे ८५ हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. तेव्हां ते बोलत होते. यावेळी प्रधानमंत्र्यांनी दहा नवीन वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला.  रेल्वे प्रणालीचा विस्तार, पायाभूत सुविधांचे

आधुनिकीकरण, प्रवाशांसाठी सुविधा आणि रेल्वे फलाटांवर मेक इन इंडिया उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी एनडीए सरकार अथक प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांनी आज अहमदाबाद-मुंबई सेंट्रल, सिकंदराबाद- विशाखापट्टणम, म्हैसूर- चेन्नई एमजीआर सेंट्रल, पाटणा-लखनौ, न्यू जलपाईगुडी-पटना, पुरी-विशाखापट्टणम, लखनौ-डेहराडून, कलबुर्गी-सर एम. विश्वेश्वरय्या टर्मिनल बंगळुरू, रांची-वाराणसी आणि खजुराहो- दिल्ली या गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. यातली अहमदाबाद-मुंबई सेंट्रल ही गाडी रविवार वगळता सर्व दिवस धावणार आहे. ही अहमदाबादहून सकाळी ६ वाजून १० मिनिटांनी सुटेल आणि मुंबई सेंट्रलला सकाळी ११ वाजून ३५ मिनिटांनी पोहोचेल. तर मुंबई सेंट्रल इथून दुपारी ३ वाजून ५५ मिनिटांनी सुटेल आणि रात्री ९ वाजून २५ मिनिटांनी अहमदाबादला पोहोचेल. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महाराष्ट्रात लातूर इथल्या मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचे दूरदृश्यप्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आलं. या रेल्वे कोच फॅक्टरीमध्ये रेल्वे आणि मेट्रो कोच तसंच वंदेभारत रेल्वे गाड्यांची बांधणी होणार आहे. प्रधानमंत्र्यांनी यावेळी मालवाहतूकीसाठी समर्पित रेल्वेमार्गाच्या दोन खंडांचं उद्घाटनं केलं. तसंच ५१ गतिशक्ती मल्टीमॉडल कार्गो टर्मिनल्स आणि एक हजार ५०० हून अधिक एक स्टेशन एक उत्पादन स्टॉलचं लोकार्पण केलं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी २० हजार कोटींच्या पेट्रोकेमिकल प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणीही केली. महात्मा गांधींचा साबरमती आश्रम हा संपूर्ण मानवजातीचा वारसा आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी अहमदाबाद इथल्या अभय घाट इथं गांधी आश्रम स्मारकाच्या बृहत आराखड्याचं लोकार्पण केलं. तेव्हां ते बोलत होते. साबरमती आश्रम या आराखड्या अंतर्गत आश्रमाचं सध्याचं पाच एकर क्षेत्र ५५ एकरपर्यंत

वाढवण्यात येणार आहे. प्रधानमंत्र्यांनी यावेळी पुनर्विकसित कोचरब आश्रमाचं उद्घाटन केलं.

**<><><><><><>**

प्रधामंत्री नरेंद्र मोदी आज राजस्थानातल्या पोखरणला भेट देणार आहेत. यावेळी ते भारत शक्ती कार्यक्रमाला उपस्थित रहाणार आहेत. या कार्यक्रमात तिन्ही संरक्षण सेवांच्या स्वदेशी क्षमतांच्या एकत्रित प्रात्यक्षिक सादर होणार आहेत. ‘भारत शक्ती’ या सरावामध्ये देशाची स्वदेशी शस्त्र प्रणालीची प्रात्यक्षिक सादर केली जाणार आहेत.

**<><><><><><>**

भारतात गेल्या २० वर्षात ४०० नवी विद्यापीठं, ७५ महत्त्वाच्या संस्था १४ नव्या एम्स, ७ नव्या आयआयटी आणि आय एम्सची स्थापना झाली असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सांगितलं. मॉरिशस मध्ये आयोजित एका खास समारंभात त्या आज बोलत होत्या. या समारंभात मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष पृथ्वीराजसिंग रुपन तसंच प्रधानमंत्री प्रविंद्रकुमार जगन्नाथ उपस्थित होते. राष्ट्रपती मुर्मू मॉरिशस दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी आज मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनानिमित्त आयोजित एका समारंभाला उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><><>**

हरयाणात मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत जागावाटपावरुन सत्ताधारी भाजपा आणि जननायक जनता पार्टी आघाडीमधे मतभेद उद्भवल्यानंतर खट्टर आणि त्यांच्या पूर्ण मंत्रिमंडळाने राजीनामा राज्यपाल बंदारु दत्तात्रय यांच्याकडे सोपवला.राज्यपालांनी राजीनामे स्वीकारले आहेत.

दरम्यान अपक्ष आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा खट्टर यांनी केला असून ते पुन्हा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे.

**<><><><><><>**

नागरिकत्व सुधारणा कायदा २०१९ अंतर्गत भारतीय नागरिकत्वासाठी पात्र असलेल्या लोकांना नोंदणी करणं सुलभ जावं म्हणून सरकारने एक नवं पोर्टल सुरु केलं आहे.

या पोर्टलचं नाव https ://indiancitizenshiponline.nic.in असं आहे. केंद्रीय गृहमंत्रालय लवकरच CAA -२०१९ या नावाचं एक मोबाईल ॲप देखील सुरु करणार असून त्यावरही नोंदणी करता येईल. केंद्र सरकारने काल या कायद्याअंतर्गत नागरिकत्व सुधारणा अधिनियम २०२४ जारी केले आहेत. या कायद्यानुसार अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानातले अल्पसंख्यांक हिंदू, शीख, बौद्ध , जैन, पारशी आणि ख्रिश्चन धर्मीय शरणार्थी भारतीय नागरिकत्वासाठी अर्ज करू शकतात.

**<><><><><><>**

नागरिकत्व सुधारणा विधेयकाला आव्हान देणारी याचिका इंडियन युनियन मुस्लीम लीगने सर्वोच्च न्यायलयात दाखल केली आहे. हा कायदा असंवैधानिक आणि मुसलमान विरोधी असून भेदभाव करणारा आहे असं याचिकेत म्हटलं आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीला तातडीनं स्थगिती द्यावी अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे.

**<><><><><><>**

आसाममध्ये २०१४ नंतर प्रवेश घेतलेल्या कोणालाही आसाममध्ये नागरिकत्व मिळणार नसल्याचं आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा यांनी म्हटलं आहे. आज सकाळी त्यांनी पत्रकारांशी नागरिकत्व सुधारणा कायद्याबबत संवाद साधला. ज्यांची नावं एनआरसी अर्थात राष्ट्रीय नागरीक नोंदणीमध्ये समाविष्ट होणार नाहीत, त्यांनाच सीएए अर्थात नागरिकत्व दुरुस्ती कायद्यातल्या तरतुदीनुसार लाभ मिळू शकतो असं मुख्यमंत्री सरमा यांनी यावेळी सांगितलं. दरम्यान या नागरिकत्व सुधारणा कायद्याविरोधात आसाममध्ये प्रमुख विरोधी पक्षांनी आज राज्यव्यापी बंदची घोषणा केली असून, अशी निर्दशनं करणं हे गुवाहाटी उच्च न्यायालयनं गेल्या वर्षी दिलेल्या आदेशाचं उल्लंघन होऊ शकतं असं सरमा म्हणाले . आसामधल्या सर्व विद्यार्थ्यांचं एक शिष्टमंडळ केंद्र सरकारला सीएए मागे घेण्याची विनंती करण्यासाठी दिल्लीला जाण्याची शक्यता आहे.

<><><><><><>

नवीन निवडणूक आयुक्तांची नेमणूक करण्यापूर्वी निवडसमितीत सरन्यायाधीशांचा समावेश करावा, अशी मागणी करणारी याचिका असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स या संघटनेनं सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. निवड प्रक्रीयेत पारदर्शकता आणण्यासाठी हे आवश्यक असल्याचं याचिकेत म्हटलं आहे.

<><><><><><>

राष्ट्रीय तपास यंत्रणेने आज पंजाब, हरियाणा,मध्य प्रदेश आणि राजस्थान आणि चंदीगढ मधे मिळून तीस ठिकाणी छापे टाकले. दहशतवादी आणि स्थानिक गुंड यांच्यातल्या संबंधांचा तपास करण्याच्या मोहिमेचा भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली. या केंद्रशासित प्रदेशात हा तपास चालू आहे.

<><><><><><>

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांची जयंती आज साजरी होत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सातारा जिल्ह्यात कराड इथं प्रीती संगमावर यशवंतराव चव्हाणांच्या समाधीस्थळी जाऊन आदरांजली वाहीली. यानंतर ते पी. डी. पाटील गौरव प्रतिष्ठान कराड इथं यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्तच्या आदरांजली कार्यक्रमात उपस्थित होते. महाराष्ट्राच्या जडण घडणीत दिवंगत यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्यामुळे आज कृतिशील आणि प्रगल्भ महाराष्ट्र घडला आहे. असं उपमुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला विविध मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत **वानखेडे स्टेडिअमवर** सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज तिसऱ्या दिवशी मुंबईच्या दुसऱ्या डावात ३ बाद ३१५ धावा झाल्या आहेत. त्यामुळे मुंबईला आता ४३४ धावांची आघाडी मिळाली आहे. अजिंक्य रहाणे ७३ धावांवर बाद झाला, तर मुशीर खान ११७ धावा आणि श्रेयस अय्यर ९० धावांवर खेळत आहे. कालचा खेळ थांबला तेव्हा मुंबईच्या, दुसऱ्या डावात, दोन बाद १४१ धावा झाल्या होत्या. शेवटची बातमी हाती आली तेव्हा, मुंबईच्या ३ बाद ३१५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

युवा मुष्टीयुद्ध विश्वचषक स्पर्धेत भारताच्या संघानं उपविजेतेपद पटकावलं आहे. या स्पर्धेत मुलींमधे भारताच्या निकिता चंद, चंचल चौधरी, पार्थिव ग्रेवाल आणि आकांक्षा यांनी विविध वजनी गटामधे सुवर्ण पदकं पटकावली. तर मुलांमधे ब्रजिश तमतानं सुवर्णपदक जिंकलं. निकिता चंदला या स्पर्धेतला उत्कृष्ट मुष्टीयोद्ध्याचा

किताबही मिळाला. याशिवाय नऊ रौप्य आणि १२ कांस्य पदकासह भारतीय संघानं एकूण २६ पदकं या स्पर्धेत पटकावली.

<><><><><><>

रमजानचा पवित्र महिना आज पासून सुरु झाला आहे. काल लखनौ आणि हैदराबादसह काही ठिकाणी चंद्राचं दर्शन झालं. हा पवित्र सण सगळ्यांच्या आयुष्यात आनंद, समृद्धी आणेल, अशा शुभेच्छा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिल्या आहेत.

//<><><><><><>//